म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बाल वा.
दा. क्र. १०७६१



# आमची ओळख

भरत

21 MAY 1972
१०७७१
३६३७८
११५१६७
३१२६

# आमची ओळख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.



# अनुक्रम


| | | |
|---|---|---|
| १ | कावळा | ३ |
| २ | बगळा | ५ |
| ३ | कोंबडा | ७ |
| ४ | बदक | ९ |
| ५ | चिमणी | ११ |
| ६ | पोपट | १३ |
| ७ | मोर | १५ |
| ८ | कोकिळा | १७ |
| ९ | मैना | १९ |
| १० | कबुतर | २१ |
| ११ | कोतवाल | २३ |
| १२ | खंड्या | २५ |
| १३ | घार | २७ |
| १४ | गिधाड | २९ |
| १५ | गरुड | ३१ |
| १६ | टिटवी | ३३ |



आवृत्ति पहिली
जानेवारी १९६४


मूल्य रु. १=००

लेखक
**पां. पि. घरत**

★

**प्रकाशक**
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
३८१ क, तपश्चर्या
शनवार, पुणें

**मुद्रक**
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय
१५२३ सदाशिव, पुणें २



# १. कावळा

माझं नाव कावळा.

माझ्या देहाला साजेल असेच नाव देवाने मला दिले आहे.

रोज सकाळी मी तुमच्या अंगणात येतो. आणि तुमच्या हातातील भाकरी घेऊन पसार होतो.

तुमच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांचा निरोप मी अगोदर तुम्हाला देतो. माझे भविष्य अचूक असते.

काय म्हणता ? मला एकच डोळा आहे. असे होय !


त्याचं असं झालं ! एकदा प्रभू रामचंद्र वनवासात असताना होम करीत होते, त्यांच्याजवळ सीतामाई बसली होती. मी तिला त्रास देऊ लागलो तेव्हा रामाने माझा नाश करण्यासाठी एक दर्भ मंत्रून सोडला. त्या दर्भाने माझा एक डोळा फोडला.

तेव्हा मी रडत रामाजवळ आलो. त्याचे पाय धरले आणि क्षमा मागितली. तेव्हा रामाला दया आली. त्याने मला आशीर्वाद दिला की, " तुझा एकच डोळा दोन्ही बुबुळात फिरेल, व दर पितृ-अमावास्येला लोक अगोदर तुला जेवण देतील. "

आणि तेव्हापासूनच मी पृथ्वीवर आलो व मानवांच्या सान्निध्यात राहावयाला लागलो. " नशिबाचा खेळ " दुसरं काय ?

बरे ! रामराम, काव–काव–काव.

---



मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# २. बगळा

माझं नाव बगळा.

माझा सारा देह पांढरा शुभ्र आहे.

ही उंच मान माझ्या देहाला अधिकच खुलून दिसते.

शेतातील टोळ खाऊन शेतकऱ्यांच्या पिकाचे मी रक्षण करतो.

गाईच्या अंगावरील गोचिड खाऊन मी गाईंना सुखी करतो.

मासे पकडण्यासाठी मी तासन् तास ध्यान करीत बसतो म्हणूनच–

माझ्या ध्यानाची स्तुती ग्रंथपुराणातहि केली आहे.

तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात,

" बकापुढे सांगे भावार्थवचन–! "


काही का असेना ? माझी आठवण मानवाला वेळोवेळी होते.

खाणे शोधण्यासाठी मी जरी शेतावर जात असलो तरी रात्री विसाव्यासाठी मात्र मी गावात अवश्य येतोच.

पुरे झाली ना माझी ओळख ?

बरे ! रामराम, बकूक् बकूक्.





# ३. कोंबडा

माझं नाव कोंबडा.

माझे हे कमानदार शेपूट आणि माझी बाकदार चोच किती आकर्षक वाटते पाहा.

रोज सकाळी मी सर्वांच्या अगोदर उठतो आणि मोठ्याने बांग देऊन सर्वांना उठवतो.

काय म्हणता—मला जाग येते कशी ?


त्याचं असं झालं. मी पूर्वी जटायू होतो. ज्या वेळी रावणाने सीता चोरून नेली, त्या वेळी सीतेला घेऊन जात असता मी रावणाला वाटेत अडविले. रावणाची आणि माझी झटापट झाली तेव्हा रावणाने माझा एक पंख तरवारीने तोडला. मी निर्बल झालो आणि जमिनीवर कोसळलो.

काही दिवसांनी राम-लक्ष्मण त्या रस्त्याने आले. रामचंद्राला मी सर्व हकीगत सांगितली. तेव्हा ते म्हणाले– " तूं आता मृत्यू लोकात ' कोंबडा ' या नावाने प्रसिद्धीला येशील. रोज पहाटेस ज्या वेळी सूर्यनारायण आपल्या रथात बसतील, त्या वेळी पृथ्वी थोडी हालेल. तू रात्री बसताना जमिनीला चोच लावून बस. म्हणजे जमिनीचे हालणे तुला समजेल. जमीन हालली की, लगेच तू मोठ्याने ओरडून सूर्यनारायणाच्या आगमनाची दवंडी दे. " त्यानुसारच मी रोज सकाळी बांग देत असतो.

पटली ना ओळख !

बरे ! रामराम. कुकूरे ऽ कुकू. ऽ

---



# ४. बदक

माझं नाव बदक.

मी मनुष्याच्या शेजारीच राहतो.

माझी ही चपटी चोच पाहा. पाण्यातील अळ्या पकडण्यासाठी हिचा मला फार उपयोग होतो.

आणि हे पाय पाहा. फार तोकडे आहेत. पण माझ्या पायातील बोटे पाहा. ती पातळ पडद्यांनी एकमेकाला

जोडली आहेत.

त्यामुळे मला पाण्यात उत्तम प्रकारे पोहता येते.

पाण्यात जितक्या सफाईने मी पोहतो तितक्या सफा-ईने मला जमिनीवर चालता येत नाही.

मला पंख आहेत. पण शरीर ढबदार असल्यामुळे मला उडता येत नाही. लोक मला हौसेने पाळतात.


मीहि त्यांना तसे उत्पन्न देतो.

माझ्या अंड्यांना व मला स्वतःला फार किंमत येते.

यापेक्षा माझ्याजवळ जास्त सांगण्यासारखे काय आहे?

बरे ! रामराम. प्यॉक् प्यॉक् प्यॉक्–

---



# ५. चिमणी

माझं नाव चिमणी.

नावाप्रमाणे माझा देहही चिमणाच आहे.

मनुष्यवस्ती मला फार आवडते.

म्हणून मी मनुष्यवस्तीतच कायम राहात असते.

घराच्या वळचणीला, आरशाच्या फटीला मी आपले घरटे घालते.

अंगणातील किडे, अळ्या अथवा दाणे टिपून मी माझे पोट भरते.

माणसंही माझ्यावर ममता करतात.

ती मला आवडीने दाणे घालतात.

काही दयाळू लोक तर माझ्या घरट्यासाठी आयत्या टोपल्या बांधून देतात.

माझ्या या चिमुकल्या चोचीने मी किडे मारते.


पण या चिमुकल्या चोचीचा भंग आरसा कधीकधी करतो.

आरसा पाहिला की माझा जीव वेडा होतो. आणि अन्नपाणी विसरून मी त्याला सारखी टोचीत बसते.

चिमुकल्या जीवाची चिमुकली ओळख गोड मानून घ्या बरं.

बरे ! नमस्ते ! चिव-चिव-चिव.

---



# ६. पोपट

माझं नाव पोपट.

ही माझी लालभडक आणि बाकदार चोच.

गळ्यावरील कंठ आणि हिरवा देह पाहून तुम्ही मोहित होता आणि मला पकडून पिंजऱ्यात ठेवता.

मला जसे शिकवाल तसे मी शिकतो आणि–

तुम्हाला सकाळी उठविण्यापासून पाहुण्याच्या स्वागतापर्यंतची कामे मी करतो.

मला फळे फार आवडतात.

हिरवी मिरची, पिकलेले डाळिंब, आणि पेरू मी आवडीने खातो.

तुमच्या घरी शिजलेला भात आणि डाळ ही तुम्ही मला खावयास देता.

पण हे गुलामगिरीचे अन्न मला आवडत नाही.

म्हणूनच कधी कधी पिंजऱ्याचे दार उघडे मिळताच मी पारतंत्र्याच्या साखळ्या तोडून स्वतंत्रपणे भटकण्यासाठी पिंजऱ्यातून पळून जातो.

यासाठी तुम्ही मला पळपुटा म्हणता.

पण स्वातंत्र्यासाठी हे मला करावेच लागते.

बरे रामराम ! मिठ्ठू-मिठ्ठू-मिठ्ठू.

---



# ७. मोर

माझं नाव मोर.

माझी ही डौलदार मान, रुपेरी अंग व सोनेरी पिसारा पाहून तुम्हाला आनंदच वाटेल. कदाचित इंद्र-धनुष्याची आठवण होईल.

मी रानातच राहतो.

परंतु तेथून काही फासेपारधी मला पकडतात आणि

माणसात आणतात. एकदा मी माणसात आलो की, मग मात्र मी रानात जात नाही.

आकाशात ढग जमूं लागले की मला फार आनंद होतो.

त्या आनंदाच्या भरात मी माझा पिसारा फुलवतो आणि थुई थुई नाचू लागतो. नाचता नाचता मी माझ्या पायांकडे बघतो आणि डोळ्यांतून अश्रू गाळतो.

विद्यादेवी सरस्वती तुम्हाला माहीत आहे ना ? तिला मी फार आवडतो. ती माझ्या पाठीवर बसते आणि सगळीकडे संचार करते.

मला भारत सरकारने राष्ट्रीय पक्ष्याचा बहुमान दिला आहे.

मी फळे व किडे खाऊन जगतो. एखाद्या माणसाला " चोरावर मोर " अशी उपमाही तुम्ही देता. पुरे झाली ना ओळख !

बरे ! रामराम. पियाँव्–पियाँव्–पियाँव्.

---



# ८. कोकिळा

माझं नाव कोकिळा.

माझा रंग काळा असून अंगावर पांढुरके ठिपके आहेत.

कावळा हा माझा शत्रू असल्यामुळे मी मोकळ्या जागेत फिरत नाही.

वसंत ऋतू आला की मला फार आनंद होतो.

त्याच्या आगमनाची बातमी मी मंजूळ गायनाने जगाला सांगते.'

वसंत ऋतू म्हणजे माझ्या जीवनातला वसंत आहे.

मी जरी वर्षातून दोनच महिने तुम्हाला भेटत असले तरी माझी आठवण मात्र तुम्हाला रोज होत असते.


एखादं सुस्वर गोड गाणं ऐकलं की तुम्ही लगेच म्हणता,


अहाहा ! काय कोकिळेसारखा गोड गळा आहे.

आणि माझे व्रतही भारी आहे. भाविक बायका आपल्या भावी आयुष्याच्या सुखासाठी माझे व्रत कठोरतेने पाळतात.

त्या दिवशी माझ्या दर्शनासाठी त्या फार अधीर होतात. पण बिचाऱ्यांना दुधाची तहान ताकावरच भागवावी लागते.

बरे, नमस्ते. कुहू–कुहू–कुहू.





# ९. मैना

माझं नाव मैना.

माझा रंग जरा करडा आहे. पण चोच पिवळी आहे.

आणि हे पिवळे पाय माझे नाहीत बरं !

काय म्हणता ! पाय कोणाचे ? असे होय ?

त्याचे असे झाले—

" पूर्वी माझे पाय होते काळे. ते मला आवडत नव्हते. तशात माझे निघाले लग्न, लग्न मोठ्या थाटात होणार होतं, पण माझे काळे पाय पाहून सर्व वऱ्हाडी लागले नाके मुरडायला.

मग मी काय केले—रातोरात गेले मोराकडे, आणि

त्याचे हे पिवळे पाय मागितले उसने. लग्न झाले मोठ्या थाटात पण पाय मात्र मी अजून त्याला परत दिले नाहीत. "

"जो दुसऱ्यावरी विश्वासला त्याचा कार्यभाग बुडाला "


मला लोक हौसेने पाळतात. मीहि विश्वासाने त्यांच्याकडे राहते.

दाणे आणि किडे खाऊन जगते मी.

बरे नमस्ते !

---





# १०. कबुतर

माझं नाव कबुतर.

आमचे अनेक रंग आणि अनेक जाती आहेत.

एकदा का माझी माणसाशी गट्टी जमली की मग मी त्याला सोडून जात नाही.

स्वराज्यात आमच्यावरचा भार फार कमी झाला.

पूर्वी पत्रं पोहचविण्याचे काम आम्ही करीत होतो.

घनघोर लढाई चालू असताहि आम्ही प्राणाची पर्वा न करता मालकाचे संदेश योग्य वेळी पोहचवीत असू.

अजूनसुद्धा परदेशात आमच्या उड्डाणाच्या शर्यती लावण्यात येतात.

मंगल प्रसंगाचे उद्घाटन आमच्याच उड्डाणाने करतात.

नेहरू चाचाला आम्ही फार आवडतो.

मानवाच्या आज्ञा पाळण्यासाठी आम्ही चंदनासारखा देह झिजवतो.

" टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपणा येत नाही. " हे म्हणणे काही उगीच नाही.

काही का असेना; तुमची सेवा हेच आमचे कार्य !

बरे, नमस्ते–! घुटूर घूम, घुटूर घूंम.

---



# ११. कोतवाल

माझं नाव कोतवाल.

चौकीवरील पगारी कोतवाल नाही बरं !

शेतावरील सेवक कोतवाल आहे मी.

कुणी मला ‘ घोशा ’ म्हणतात तर कुणी ‘ बैलघोशा ’ म्हणतात.

माझे सारे अंग काळे, शेपूट जरा लांब असून

टोकाला दुभागलेले आहे.

मी बहुतेक शेतावरच राहतो. शेताची नासाडी करणाऱ्या टोळांना मी खाऊन टाकतो व शेतकऱ्यांना मदत करतो.

उन्हाळ्यात बैलाच्या पाठीवर बसून मी माझे भक्ष्य शोधतो.

माझी चोच फार तीक्ष्ण आहे. त्यामुळे घार, कावळा इत्यादि पक्ष्यांवर मला सफाईदार हल्ला करता येतो.


माझे घरटे पेल्याच्या आकाराचे असते.

इतर पक्षी धुराने व्याकूळ होतात तसा मी धुराने व्याकूळ होत नाही.

पुरे झाली ना ओळख.

बरे ! रामराम. चिचीक् चीक्.

---



# १२. खंड्या

माझं नाव खंड्या.

जिथे पाण्याचा साठा तिथे माझे घर.

माझे सारे अंग सोनेरी.

चोच तांबूस आणि लांब.

पाण्याच्या काठावरील एखाद्या डहाळीवर मी दबा धरून बसतो.

मासा पाण्याच्या पृष्ठभागावर आला की मी त्याच्या-

वर एकदम झडप घालतो.

कधी कधी त्याला पकडण्यासाठी मला बुडीही मारावी लागते.

म्हणूनच मला पाहिल्यावर मुले आनंदाने म्हणतात.

" खंड्या, खंड्या बुडी मार ! "


आणि त्याच वेळी मी जर का बुडी मारली की त्यांना किती आनंद होतोय म्हणून सांगू-साने गुरुजी म्हणतात ना ?

" करिल मनोरंजन जो जयांचे ।
घडेल नाते प्रभुशीं तयाचें ॥

त्यांच्या या म्हणण्याप्रमाणे वागण्याचा मी आटोकाट प्रयत्न करतो बरे.

बरे ! रामराम. चील्-चील्-चील्.

---



# १३. घार

माझं नाव घार.

रंग माझा करडा. पण पायाचे पंजे फार बळकट.

नजर इतकी तीक्ष्ण आहे की, मी कितीही उंचावर घिरट्या घालीत असले तरी जमिनीवर फिरणारी कोंबडीची पिले मला दिसतात.

मग त्यांच्यावर मी इतक्या सफाईने झडप घालते की–डोळ्याची पापणी लवते न लवते इतक्यात मी कोंबडीचे पिल्लू माझ्या बळकट पायात पकडते व आकाशात घेऊन जाते.


माझी चोच पाहा–किती धारदार आहे. या चोचीनेच मी प्राण्याचे मांस फाडून खाते.

उंच झाडावर मी माझे घरटे घालते. त्यामुळे शत्रूपासून माझ्या पिलांचे रक्षण होते. माझी पिले घरट्यात असताना मी कितीही उंचावर फिरत असले तरी माझी नजर माझ्या पिलावर. म्हणूनच मातेच्या हृदयाचे वर्णन करताना–

" घार फिरे आकाशी परी चित्त तिचे पिलापाशी " असे म्हटले आहे.

बरे नमस्ते ! चींहीहीही–चींहीहीही.

---



# १४. गिधाड

माझं नाव गिधाड.
माझं रूप पाहून तुम्ही मला गबाळे म्हणाल–पण
‘ रूप दिसे बावळे परी अंतरीं नाना कळा ’
हे वाक्य तुम्हाला माहीत आहे ना–
माझे नाक इतके तीक्ष्ण आहे की–मी कितीही

उंचावर असो अथवा कितीही लांब असो परंतु घाणीचा वास मला तत्काळ येतो.

तुमच्या गावानजीक जी मृत जनावरे पडतात, त्यांचे मांस मलाच खावे लागते.

मी जर ते खाल्ले नाही तर साऱ्या गावात दुर्गंधी पसरेल व रोगराई होईल.

म्हणूनच मला कोणी कोणी ग्रामपंचायतीच्या आरोग्य-खात्याचे पुढारी असेही म्हणतात,

खरं पाहिलं तर 'सफाईखाते' हे मलाच द्यावयाला हवे.

गबाळ्या प्राण्याची ही अल्प ओळख पुरे झाली.

बरे रामराम ! खिं खी खी खी की.

---



# १५. गरुड

माझं नाव गरुड.
पक्ष्यांचा राजा आहे मी.
माझ्या पंखात भयंकर जोर आहे.

म्हणूनच श्रीविष्णूला मी माझ्या पाठीवर बसून वाटेल त्या ठिकाणी फिरवतो.

मातृभक्ति म्हणे मानवातच आहे.

पण माझी मातृभक्ति फार अलोट आहे.

माझ्या मातेची इच्छा पूर्ण करण्यासाठी मी स्वर्गी-तला अमृतकुंभ तिला आणून दिला होता.

मला पाहताच शंकराच्या गळ्यातील सापाची त्रेधा तिरपीट उडते.


प्राण्यांची गाऱ्हाणी देवांच्या कानावर मीच घालतो.

म्हणतात ना–

" प्रत्येकाच्या पंखात गरुडाची भरारी असावयास हवी. "

वेळ फार झाला म्हणून थोडक्यातच

बरे ! रामराम.



# १६. टिटवी

माझं नाव टिटवी.

... जरा हिरवी असून, डोळ्यांवर तांबडे

... पाठीवर कोठेही मी राहूं शकते.

माझ्या पराक्रमाचे वर्णन तुम्ही पुराणात वाचताच.

सागराने माझ्या पिलांना जलसमाधि दिली म्हणून सारा सागर चोचीने उपसण्याचा मी प्रयत्न केला होता.

हिंमत असली की, सारे होते.

मी रात्री ओरडले की माझ्या ओरडण्याला लोक अशुभ मानतात.

पण ओरडण्यात अशुभ असे आहे काय ?

" भित्यापाठी ब्रह्मराक्षस दुसरे काय ? "

अशुभ प्राण्याने जास्त वटवट करू नये असे म्हणतात.

म्हणूनच माझी ओळख मी सर्वांच्या शेवटी करून दिली.

बरे ! नमस्ते. टिटीव टीव–टिटीव टीव.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. १०७९१ नों. दि ....
व. बाल वा ... क्र. ....

***

## ※ आमचें बालवाङ्मय ※

| | |
|---|---|
| * रानगांवची आगगाडी | : सौ. सुमति पायगांवकर |
| * पोपटदादाचें लग्न | : ,, ,, ,, |
| * फाट्-फूट्-धूम् | : ,, ,, ,, |
| * गंमत जंमत | : राजा मंगळवेढेकर |
| * माणिक आणि मोती | : शं. रा. देवळे |
| * छान छान गीतें | : सौ. उषा देशमुख |
| * सुंदर आमचा गांव | : जोशी - निर्मळ |
| * लिली बाहुली | : त्रि. स. गवाणकर |
| * नाना गोष्टी | : ना. ग. नारळकर |
| * आमची ओळख भाग १ | : पां. पि. घरत |
| * आमची ओळख भाग २ | : ,, ,, ,, |
| * आमची ओळख भाग ३ | : ,, ,, ,, |

व्हीनस प्रकाशन

३८१ क, शनिवार पेठ : पुणें २

